# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २५३ - २३** **दिनांक : - ०८/०८/२०२३**

## ऑनलाईन फसवणूक करणाऱ्यास राजस्थान मधुन अटक
## मांडवी पोलीस ठाणेची कामगीरी

फिर्यादी यांनी GOOGLE SERARCH मध्ये HOTEL NEARBY असा सर्च टाकून शोध घेतला असता, व्हॉटसअॅप वर असलेला मो.क्र. ९५०९८५३१८७ उपलब्ध झाला. नमुद नंबरवर व्हॉटसअॅपवर Hi असा मॅसेज पाठवला असता मो.क्र. ९५०९८५३१८७ वरुन व्हॉटसअॅप कॉल करुन हॉटेल बुकींग करीता मो.क्र. ६३६७४१५३७४ वर ऑनलाईन पेमेन्ट पाठविण्यास सांगण्यात आले. फिर्यादी यांनी ऑनलाईन पेमेन्ट पाठविल्यानंतर त्यांना व्हॉटसअॅपवर https://maps.app.goo.gl/doJf8TqbqQbAHfG76 अशी लिंक आली. नमुद लिकवर फिर्यादी गेल्यानंतर त्यांना व्हॉटसअॅप कॉन्फरन्स कॉल करुन आरोपीने UPI PAYMENT APPLICATION आणि IMPSAPPLICATION च्या एकुण 8 ट्रान्झॅक्शव्दारे 88,800/- रुपये इंडिया पोस्ट पेमेन्ट बॅक, बनस्वरा बस स्टॅन्ड जवळ, राज्यस्थान खाते क्र. 044510048676 वर जमा करुन फिर्यादीची आर्थीक फसवणूक केली असल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मांडवी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. 144/2023, भा.दं.वि.सं. कलम 420, 34 सह आय.टी.अॅक्ट कलम 66 प्रमाणे दिनांक २२.०५.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाच्या तपासात तांत्रीक विश्लेषनाच्या आधारे सदर गुन्हा हा आरोपी १. लक्ष्मराज संजयसिह झाला वय २२ वर्षे, रा. गोपीनाथका गडा, ता. गढी, जि. बांसवाडा, राज्य राज्यस्थान, ( सिम प्रोव्हायडर ) २. सुभाष प्रभुलाल मकवाना वय २१ वर्षे, रा. नयातलाब, पो. पाराहेदा ता. गढी, बांसवाडा, राज्य- राज्यस्थान मो.क्र. 6367415374 चा धारक यांचा सहभाग निपन्न होत असल्याने राज्यस्थान बांसवाडा येथे पोलीस पथक पाठवुन ताब्यात घेवुन दिनांक ०५/०८/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हाचे तपासामध्ये आरोपींनी उपरोक्त गुन्हयाशिवाय इतर अनेक लोकांची फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. लोकांची फसवणुक करण्यासाठी आरोपी खालील प्रमाणे मोबाईल क्रमांक व **PAYTM** नंबरचा वापरत होते.

**1) 9509853187 2) 6367415374**

**Transferee UPI Id 1) riyaupdhyay568@okicici 2) 6367415374@paytm**

याशिवाय इंडिया पोस्ट पेमेन्ट बॅक, बासवाडा, राज्यस्थान चे खाते क्र. 044510048676 चा वापर करत होते.

तरी नमुद एमओबी प्रमाणे वर नमुद मोबाईलल नंबर व बॅक खाते वापरुन आपले फसवणुक केल्या प्रकरणी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हे/तक्रारी अर्ज असल्यास मांडवी पोलीस ठाण्याशी संपर्क करावा.

गुन्हयात अटक आरोपीची दिनांक १०/०८/२०२३ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. नमुद गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रफुल्ल वाघ मांडवी पोलीस ठाणे, मो.क्र. ८८८८८३४१३६ हे करीत आहेत.

----ooo-----